# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विषयी विचार

**डॉ. संतोष प्रभाकर गुट्टे**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
श्री शिवाजी कॉलेज, कंधार
sangutte@gmail.com

**प्रस्तावना :-**

भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. आणि खेड्यांचा प्रमुख व्यवसाय कृषी हा आहे. भारताचा आर्थिक विकास साध्य करावयाचा असेल तर ग्रामीण भागाच्या पर्यायाने कृषीचा विकास करावा लागेल याची जाण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती. भारतीय समाजमनाचा अभ्यास असणारा एक दृष्टा विचारवंत म्हणून बाबासाहेबांकडे पाहिजे जाते. बाबासाहेब सर्वप्रथम एक अर्थशास्त्री होते. भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी अर्थव्यवस्था असल्याने शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शेतकऱ्यांचे कैवारी होते. शेती ही भारतीयांच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे अशी तत्कालीन राजनेत्यांची मानसिकता होती परंतू बाबासाहेबांचा यावर आक्षेप होता. ते म्हणत "शेती ही केवळ उपजिवीकेचे साधन नसून राष्ट्रीय उत्पन्नाचा प्रमुख आधार आहे. तसेच भारताच्या ग्रामीण विकासाचा केंद्र बिंदू आहे. शेती मधूनच येथील लोकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार प्राप्त होतो. म्हणून शेतीकडे उद्योग म्हणून पाहिले पाहिजे. शेती विकसित झाली तर ग्रामीण भागाचा कायापालट होईल. पर्यायाने राष्ट्राचे उत्पन्न वाढेल व आर्थिक सुबत्ता येईल. रोजगारांसाठी होणारे स्थलांतरे थांबतील असे सखोल चिंतन बाबासाहेब मांडतात. "

तत्कालीन कालखंडात भारतात शेती ही पारंपारिक पध्दतीने केली जात असे. शासनाकडून (ब्रिटीश ) फारशी मदत शेतकऱ्यांना मिळत नव्हती. त्यामुळे शेतकरी खाजगी सावकाराच्या पाशात अडकून पडत. एकदा का शेतकरी खाजगी सावकाराच्या कर्जात अडकला की त्याची मृत्युपर्यंत सुटकाच व्हायची नाही. अशी परिस्थिती त्याकाळी होती.

बाबासाहेबांनी शेती विकासासाठी पुढील विचार मांडले

**१) भारतातील शेतजमीनीचे लहान क्षेत्र :-**

बाबासाहेबांनी "Small Holding in India and their remedies" हा लेख Journal of the Indian economic Society च्या अंकात लिहिला. त्यात त्यांनी भारतीय शेती ही पारंपारिक पध्दतीने केली जाते व तसेच शेतीचे धारणा क्षेत्र लहान आहे. त्यामुळे शेतीमध्ये फारसे प्रयोग करणे शेतकऱ्यांना शक्य नाही. लहान धारणा क्षेत्राची कारणे बाबासाहेबांनी लोकसंख्या, वारसा हक्क व हस्तांतरण ही सांगितली आहेत. लहान धारणा क्षेत्र असल्यामुळे शेतकरी व्यापारी शेती न करता उदरनिर्वाहासाठी शेती करतो. त्यामुळे त्याला अत्यल्प आर्थिक लाभ प्राप्त होतो. शेतीचे लहान लहान तुकडे होण्यामागे हिंदू-मुस्लिम कायदे जबाबदार असल्याचे मत त्यांनी मांडले त्यासाठी त्यांनी शेत जमिनीचे हस्तांतरण करण्यावर ठराविक मर्यादा लावावी ज्यामुळे शेतीचे लहान तुकडे होणार नाहीत असा उपाय सुचविला आहे.

**२) शेतक-यांच्या प्रश्नांसाठी आंदोलन :-**

शेतक-यांना न्याय मिळवून देण्यासाठी १९२८ पासूनच बाबासाहेबांनी शेतक-याचे प्रश्न हाती घेतले. त्यांनी कोकणातील शेतक-यांची खोतांच्या दास्यातून मुक्तता व्हावी म्हणुन मोठी चळवळ सुरु केली. १४ एप्रिल १९२९ रोजी रत्नागिरी जिल्हा शेतकरी परिषदेचे अध्यक्ष बाबासाहेब होते. १७ सप्टेंबर १९८७ मध्ये त्यांनी खोती पध्दत नष्ट करण्यासाठी विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले.

कोकणातील रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यामध्ये खोती पध्दती प्रचलित होती. या पध्दतीमुळे येथील शेतकऱ्यांना खोताचा जुलूम सहन करावा लागत असे कारण खोत हा गावाचा मालक होता तो राजाप्रमाणे वागायचा. खोत म्हणजे मक्तेदार असा अर्थ आहे. खोत अनेक प्रकारे येथील लोकांवर अन्याय अत्याचार करत असे. खोत हा ब्राम्हण असला तर कुळांच्या परसातल्या झ ाडावर फणस राहावयाचा नाही. खोत मराठा किंवा मुसलमान असला तर तो कोंबडी शिल्लक ठेवायचा नाही म्हणजे कुळाला स्वामित्व कोठेच नव्हते. खोती पध्दती मुळे येथील शेतकऱ्यांच्या जुलूमाला पारावार उरली नव्हती. खोताचे समुळ उच्चाटन केल्याशिवाय शेतकऱ्यांना मुक्ती मिळणार नाही म्हणुन बाबासाहेबांनी चळवळ केली.

**३) शेतीचे राष्ट्रीयकरण :-**

देशात समता प्रस्थापित करण्यासाठी जमीनदारीचे उच्चाटन करणे गरजेचे असल्याचे मत बाबासाहेबांनी मांडले तसेच शेतीचे राष्ट्रीयीकरण करावे असेही बाबासाहेब सांगतात. भारतीय शेतीचे लहान लहान तुकडे असल्यामुळे उत्पादन कमी होते. जमीनदार कुळाचे शोषण करतात, म्हणुन शेतीचे राष्ट्रीयीकरण करावे ज्यामुळे शेतीमध्ये आधुनिकीकरण करणे शक्य होईल व उत्पन्नात वाढ होईल. शेतीचे राष्ट्रीयीकरण केल्यामुळे शेतीची मालकी शासनाकडे राहील त्यामुळे आपोआपच जमीनदार, शेतकरी, भुमिहीन मजूर असे समाजातील वर्ग, नष्ट होतील. शासनाने जमीनीची समान वाटणी गावामध्ये करुन शेती उत्पन्न वाढविण्यासाठी, पाणी , खते, बियाणे, जनावरे इ. साहित्यांचा पुरवठा शेतकऱ्यांना करावा असे विचार बाबासाहेबांनी मांडले.

**४) जल व्यवस्थापन :-**

सजिवाला जिवंत राहण्यासाठी पाणी हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. शेती आणि पाण्याचा अतिशय घनिष्ठ सहसंबंध आहे. भारतीय शेती व्यवसाय मान्सुनच्या पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे उत्पन्नाची हमी नाही. मान्सून कधी खुप पाऊस देतो तर कधी खंड पडून कोरडा दुष्काळ पडतो. म्हणुन शेतीसाठी पाण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे. जलसिंचनाच्या माध्यमातून शेतीला पाणी उपलब्ध करुन दिल्यास दरमाही पीके घेता येतात. व उत्पन्नाची हमी प्राप्त होते. शिवाय व्यापारी पिकांचे उत्पादन घेता येते. बाबासाहेब म्हणतात, महाराष्ट्रासारख्या राज्यात सिंचनाचे प्रमाण अत्यल्प आहे कारण त्याठिकाणी उत्तर भारतासारख्या (गंगा, यमुना) दरमाही नद्या नाहीत.  म्हणून त्यांनी नद्या जोड प्रकल्पाच्या माध्यमातून उत्तरेकडील पाणी दक्षिण भारतात आणण्याची शिफारस केली आहे. असा विचार मांडणारे बाबासाहेब हे पहिलेच होते. दुष्काळ हटवायचा असेल तर पाण्याचे काटेकोर नियोजन करावे व त्यासाठी सरकारने प्रयत्नशिल असणे गरजेचे आहे असे मत बाबासाहेब मांडतात.

**सारांश :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कृषीसंबंधी मांडलेले विचार हे आजही मौलीक आहेत. कारण भारतीय शेतीची दशा व दिशा आजही फारशी सुधारलेली दिसून येत नाही. त्यांच्या विचारांची आजच्या आधुनिक भारतातही आवश्यकता असल्याचे दिसते. कारण इतर क्षेत्राच्या तुलनेत भारतातील कृषी क्षेत्राचा विकास म्हणावा तसा झालेला नाही. परंतू बाबासाहेबांच्या विचारानुसार

शेती साठी पाणीपुरवठा, बी-बियाणे, खते, यंत्रसामुग्री, कर्जपुरवठा देण्याचा प्रयत्न भारत शासन करत आहे.

**संदर्भ :-**

१) Dhananjay Keer, Dr. Ambedkar life and mission, Popular prakashan Bombay, १९८७.

२) W.R. Mujawar, Social and Political thought of Dr. B.R. Ambedkar, Mang संउ Publication, Delhi -२०११.

३) डी.एम. तंजलवाड - युगपुरष डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिवानी प्रकाशन, नांदेड २०१४.

४) डॉ. एस.एस. खंदारे - जागतिक आर्थिक विचारवंताचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.